**वादीतर्फे सा.क्र.९ (नि.क्र.४६१)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-** तुकाराम भानुदास येलदे, **वय:-** ७० वर्षे,

**व्यवसाय:-** काही नाही , **रा.** धानोरा, ता.औसा, जि.लातूर.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने शपथेवर सुरु.</u>**

**०१.** माझी वादी आणि प्रतिवादी यांच्याशी ओळख नाही. मी गंगाधर देपे यांना ओळखतो. २००० ते २००७ या काळात मी त्यांच्या कोपरा येथील शेतावर कामाला होतो. मी पाण्याच्या मोटारचे काम करीत होतो. लातूर येथे सावकाराच्या दुकानात हाडबे हे वादीचे मुनीम आले होते. माझे मोटार रिवायडींगचे दुकान सावकाराच्या दुकानाच्या पलीकडे होते. सावकारांनी मला हाडबेसोबत त्यांचे काम करायला कोपरा गावी जाणार का असे सांगितले. त्याप्रमाणे मी शेतावर गेलो. मोटारचे स्टार्टर बिघडला होता, तो दुरुस्त केला. ८-१५ दिवसांनी वादी तेथे आले आणि मला तेथे पगारावर काम करायला ठेवले. वर्षाला ६०,०००/- रुपये पगार द्यायचे ठरले. मी वादींच्या घरीच राहत असे. मला वादीची शेती माहिती आहे व त्यात वीज मोटारी कुठे आहेत, हे माहिती आहे. नदीकडील विहीरीवर एक आणि ओढयावरच्या विहीरीवर तीन मोटरी होत्या. तळयावरुन दोन पाईपलाईन केल्या होत्या. त्या पाईपलाईनचे पाणी विहीरीमध्ये पडत होते. वारद मंडळीसोबत वादींची भांडणे झाली. वारदच्या रानातून परवानगीने पाईपलाईन घालण्यासाठी खड्डे घेण्याचे काम चालू असताना त्यांची भांडणे झाली. पोलिसांनी मला, राम क्षिरसागर आणि हाडबे यांना किनगांव पोलीस स्टेशनला नेले होते. मोटारींचे सगळे काम मीच करीत होतो. सदरचे सगळे पाणी डाळींब बागेला जात होते. सदर डाळींब १०० एकर होते. सदर डाळींब बागेची देखभाल, लागण वादी करीत होता. संभाजी यांचा आम्हाला आधार होता. बालाजी आणि संभाजी यांनी सदर जागा वादीला दिली होती असे ते मला म्हणायचे. संभाजीचा मुलगा राहुल याला मी ओळखतो. वादीच्या डाळींब बागेशिवाय आणखी कोणाचीही डाळींब बाग नव्हती.

साधारण १० पुरुष आणि २५-३० रोजच्या बायका तेथे कामाला यायच्या. एक वर्ष त्यात कांद्याचे पीक घेण्यात आले होते. नाशिकचे बापु या डाळींब बागेसाठी यायचे. डाळींब बाग छाटणीसाठी संतोष यायचे. २००० सालापुर्वी ५-७ वर्षे मी मोटारीचे काम करायचो. जे.सी.बी., ट्रॅक्टर ही शेतीची अवजारे, दुभती जनावरे आणि एक घोडी असे वादीकडे होते. प्रतिवादी संभाजी किंवा त्याचा मुलगा राहुल यांनी तेथे डाळींब लागवड केल्याचे मी बघितले नाही. काल रात्री राहुलने मला फोन करुन साक्षीला येवू नका, येवुन काही फायदा नाही असे म्हटले. मी आजरोजी माझा फोन आणलेला आहे. त्यामध्ये रात्री ८.०० च्या दरम्यान हा फोन आला होता. शेळके वकील काय वाचवतात ते बघू असे म्हणाले. ८७६६८०३७४९ हा तो नंबर आहे. दुसरे काहीही कारण त्यांनी मला फोन करण्यासाठी नव्हते. मला लातूरला जायचे आहे. असा फोन आल्यामुळे मला भिती वाटत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.डी.ए.पौळ यांच्यावतीने सुरु.</u>**

**०२.** मी ९ वी नापास आहे. मोटार मेकॅनिकचा कोर्स मी केलेला नाही. मला वादी, प्रतिवादींच्या जमिनींचे स.क्रमांक सांगता येत नाहीत. कोणाच्या नावे किती जमीन आहे, हे मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.५ च्या नावे तेथे एक विहीर असल्याचे मला माहिती नाही. चिखली रोडला लागून अशोक पाटील यांची जमीन होती, हे खरे आहे. हे खरे की, त्या जमिनीत डाळींब पीक होते. हे खरे नाही की, तळयावरुन केलेल्या दोन पाईपलाईनपैकी एक वादीची व दुसरी प्रतिवादी क्र.१ ची होती. हे खरे की, वादी आणि प्रतिवादींची जमीन सोडून अन्य लोकांच्या रानातही डाळींबाचे पीक होते. हे खरे की, वाद जमिनीमध्ये कधीतरी राहुल येत असे. वादीचे काम वगळता मी अन्य लोकांच्याही मोटारी दुरुस्त करायचो. मी स्वत: वारद यांच्या रानातून पाईपलाईन घालण्यासाठी वादीने घेतलेला परवाना पाहिलेला नाही. पोलिसांनी माझ्याविरुध्द त्या प्रकरणात कारवाई केली नाही किंवा कोर्टातून मला जामीन घ्यावा लागला नाही. कोणाला किती जमीन आली, वाटण्या झाल्या का हे मला माहिती नाही. कोर्टाची नोटीस आल्यानंतर मला यायला

सांगितले म्हणून मी आलो. मी वादीच्या गाडीने आलेलो नाही. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, वादीने संपुर्ण डाळींब बाग केल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, वर्षाला रुपये ६०,०००/- पगार वादी मला देत, हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, वादीच संपुर्ण बागेची देखभाल करीत असे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे की, तब्येत बरोबर नाही तर येवु नका असे सांगण्यासाठी मला राहुलने फोन केला होता.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:१८/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.